Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Peer-Reviewed & Refreed Indexed**


**Multidisciplinary International Research Journal**


## Contemporary Issues&Challenges in Humanities

**SPECIAL ISSUE -224(C)**

**March-2020**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Santosh Kurhe
Coordinator
Professor & Head of Department Pub.Admn.
Swatantraya Sainik Suryabhanji Pawar
College, Purna (Jn), Dist.Parbhani Maharashtra

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 38 | महिला सक्षमीकरण –स्वरूप आणि मर्यादा डॉ.शिंदे सुरेखा सदाशिवराव | 148 |
| 39 | ग्रामीण विकासात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका प्रा.डॉ.विलास आबा गायकवाड | 154 |
| 40 | सामाजिक न्याय आणि भारतीय संविधान डॉ.श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे | 157 |
| 41 | भारतीय शेती व्यवसायासमोरील आव्हाने आणि उपाय प्रा.डॉ. मारोती बालासाहेब भोसले | 159 |
| 42 | संयुक्त राष्ट्र संघटना आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद डॉ. क्षीरसागर दिलीपकुमार दगडू | 163 |
| 43 | भारतातील शेतकरी आंदोलन : राजकीय दिशा प्रा. डॉ.फुके वृषाली लक्ष्मीकांत | 168 |
| 44 | आपत्ती प्रशासनात स्वयंसेवी संस्थाची भूमिका प्रा. डॉ. वसंत पांडूरंग सरवदे | 170 |
| 45 | भारतातील शेतकऱ्याचे आत्महत्याचे वाढते प्रमाण डॉ. माधुरी के. तानुरकर | 172 |
| 46 | समकालीन प्रशासनातील नैतिकता : एक अवलोकन डॉ. शंकर लेखणे | 177 |
| 47 | शंकर भाऊ साठेरू समतावादी साहित्यिक डॉ. मारोती कसाब | 180 |
| 48 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय<br>प्रा.डॉ.श्रीराम खाडे | 183 |
| 49 | भ्रष्टाचार - भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान प्रा.डॉ.पी.एस.लोखंडे | 190 |
| 50 | शेतकरी आत्महत्येच्या विविध कारणांचा शोध एक मिमांसा<br>फकिरा भगवान राजगुरू (प्रा.शिक्षक) | 192 |
| 51 | हवामान बदलावर प्रभावी उपाय : ग्रीन ऑडिट डॉ. गंगणे जीवन सुदामराव | 199 |
| 52 | महिला सबलीकरण : एक आकलन अंबिका गोविंदराव चोंडे | 204 |
| 53 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या डॉ. श्रीहरी दासू चव्हाण | 206 |
| 54 | मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>डॉ. प्रा. विश्वनाथ माधवराव सुर्यवंशी | 210 |


Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue 224(C)
ISSN : 2278-9308
March 2020

# समकालीन प्रशासनातील नैतिकता : एक अवलोकन

डॉ. शंकर लेखणे
लोकप्रशासन विभाग प्रमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर.

**प्रस्तावना**

प्रशासनाच्या स्वरूपामध्ये समुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी जागतिकीकरणाची घटना महत्वपुर्ण ठरली आहे. जीवनाच्या अनेक क्षेत्राला या घटनेने प्रभावीत केले आहे. शासन व्यवस्थेतही आता नवनवीन संकल्पनांचा स्वीकार करण्यात येत आहे. लोकांचे जीवन अधिक संपन्न व समृध्द करण्यासाठी सुशासनासारख्या निरोगी व कल्याणकारी विकासाच्या संकल्पनांचा अंगिकार करण्यात येत आहे. सार्वजनिक क्षेत्रात सेवा वितरण व्यवस्थेतही बदल होत आहेत. 'विविध कृती कार्यक्रमामध्ये खाजगी क्षेत्र आणि नागरी समाज संघटनांच्या सहभागाला आवाहन केले जात आहे. सध्या खाजगी क्षेत्र संघटना व अशासकीय संस्था यांच्याकडे सार्वजनिक सेवा हस्तांतरित करण्यात येत आहेत.' याचे व्यवस्थापनही प्रशासनास करावे लागत आहे. परंतु यातुनही कल्याणकारी धोरणास अनुसरून जनतेचा सर्वांगीण विकास करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. नव्या व्यवस्थेतून व धोरणातून खरोखरच लोकांचे जगणे सुसहस्य होत आहे का ? लोकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक होऊन त्यांचे कल्याण साधण्यात शासन यशस्वी होत आहे का? प्रशासन आपले कार्य प्रभावीपणे, पारदर्शकपणे करत आहे का? यासारख्या प्रश्नांचा मागोवा घेणे आवश्यक ठरते.

समकालीन समाजातील प्रश्नांकडे लक्ष दिल्यास आपणास असे दिसुन येते की, शेतीचे व शेतकऱ्याचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ·या प्रश्नांची भिषणता व्यक्त करण्यास पुरेशा आहेत. लोकांचे आरोग्याचे प्रश्न, रोजगाराचे प्रश्न, गुणवत्तापुर्ण शिक्षणाचे प्रश्न, सुशिक्षित बेकारांचे प्रश्न, असंघटित व उपेक्षीतांचे प्रश्न आजही गंभीर स्वरूपात आहेत. याचाच अर्थ सार्वजनिक सेवांचे वितरण दर्जेदार होत नाही. हेच यातून दिसुन येते. दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगानेही नोंदवलेले निरीक्षण येथे नमुद करणे आवश्यक आहे. त्यांच्यामते, ''भारतातील सार्वजनिक प्रशासन सेवा हया त्यांच्या अकार्यक्षमता, भ्रष्टाचार व दप्तरदिरंगाई किंवा कार्यविलंब यासाठी ओळखल्या जातात. म्हणून या व्यवस्थेला सुधारण्याचा एक मार्ग म्हणुन त्यांनी आपल्या चौथ्या अहवालात प्रशासनातील नैतिकतेवर व नैतिकतेला प्रोत्साहन देण्यावर भर दिला आहे.

एकंदरित आपल्या समोरचे जे अनेक विकासाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यांची प्रभावीपणे सोडवणूक करण्याचे सामर्थ्य व शक्ती ज्या प्रशासन व्यवस्थेत आहे ती व्यवस्था दोषमुक्त होणे गरजेचे आहे. त्यासाठीचा एक प्रभावी मार्ग म्हणून प्रशासनाला नैतिकतेचे अधिष्ठान असणे गरजेचे वाटते.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

प्रशासनातील नितीमूल्यांची आवश्यकता जाणून घेणे तसेच कोणती नितीमूल्ये प्रशासनास उपयुक्त आहेत. या विषयाचे मतप्रवाह समजून घेणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत :**

प्रस्तुत लेखासाठी माहिती संकलनाच्या दुय्यम साधनांचा अवलंब केला आहे. यात विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित ग्रंथ व अहवालाचा आधार घेण्यात आला आहे.

**संकल्पना स्पष्टीकरण :**

नितीमूल्यांमुळे माणसाचे जीवन अंतर्बाहय उजळून निघते असे म्हणतात. नैतिक शिक्षण आणि मूल्य संस्कार यांचा वापर करून जीवनातील सर्व क्षेत्रातला बिघडलेला तोल सावरता येईल असा विश्वासही व्यक्त केला जातो. 'विविध कृतीची मालिका म्हणजे व्यक्तीचे आचरण, आचरणामुळे जीवन बनते, आचरण म्हणजे जीवनाची रीत ते आचरण चांगले असणे म्हणजे नैतिकता.'



Scanned with CamScanner

'निती हा शब्द सामाजिक संदर्भामध्ये वापरला जातो दुसऱ्याशी चांगले बोलणे, चांगले संबंध ठेवणे, कोणतीही गोष्ट सदसदविवेकाच्या आधारावर करणे, प्रत्येक कार्य सत्य व प्रामाणिकपणे करणे, कोणाशीही नि:पक्षपातीपणे वागणे हा अर्थ निती या शब्दात अंतर्भूत आहे.' नैतिकता हे नितीचे विशेषण आहे

**प्रशासनासाठी नितीमूल्यांची आवश्यकता :**

प्रशासनाच्या कल्याणकारी धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व सुशासनाची संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी प्रशासनाला नितीमूल्यांची आवश्यकता आहे. सुशासनाची जी महत्वपूर्ण वैशिष्टये सांगितली जातात. मतैक्याभिमुखता, सहभागी, उत्तरदायी, पारदर्शक, प्रतिसादात्मक, प्रभावशिल व कार्यक्षम, नि:पक्षपाती, न्याय्य व समावेशक आणि कायदयाचे अधिराज्य अशा वैशिष्टयपूर्ण प्रशासन व्यवस्थेची उभारणी नैतिकतेचे अधिष्ठान असल्याखेरीज होणे शक्य नाही.

दुसऱ्या प्रशासकीय सुधारणाः आयोगानेही 'प्रशासानामध्ये विश्वास आणि आस्था वाढावी यासाठी पारदर्शकता, निर्भयता, निष्पक्षता आणि न्यायपूर्णता या मूल्यांची आवश्यकता असते. व या मूल्यांना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे'. असे नमूद केले आहे.

पॉल ॲपलबी सारख्या विचारवंतानेही लोकप्रशासनात प्रामाणिकपणा आणि निष्ठा या गुणांचा पुरस्कार केला आहे. तसेच स्टीफन बेलीनेही 'अशावाद, साहस आणि करूणामिश्रीत नि:पक्षपातीपणा हे सार्वजनिक क्षेत्रातले तीन अनिवार्य गुण आहेत असे म्हटले आहे.मोहित भट्टाचार्यनेही आपल्या **'न्यू होरायझन्स ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन'** या ग्रंथात प्रशासकीय जीवनाच्या पार्श्वभूमीवर तीन प्रकारची नैतिक मूल्ये आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. (१) संवैधानिक मूल्य (२) प्रसंगोपात नैतिकता (३) वैयक्तिक नैतिकता. संवैधानिक मूल्ये प्रशासनाच्या कारभाराच्या मूळ गाभा या स्वरूपात असतात. प्रशासनाला संवैधानिक मूल्यांच्या चौकटीत राहूनच कार्य करावे लागते. प्रासंगिक किंवा कर्तव्य पार पाडतांना असे अनेकं प्रसंग येतात जेथे प्रशासकाला विचार करून निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते. वैयक्तिक मूल्यांचा प्रासंगिक मूल्यांशी घनिष्ठ संबंध असतो. एखादया प्रशासकीय परिस्थितीत प्रत्येक वेळी उचित निर्णय घेणारी एक व्यक्तीच असते. वैयक्तिक नितीमत्तेची संकल्पना या वर्तनामागे असते.

'प्रशासनातील व्यक्तीनी उत्तरदायित्व, समानता, निर्भयता व धैर्य, कार्यकारी वृत्ती, स्वयंशिस्त, श्रध्दा आणि विश्वास या मूल्यांची जोपासना करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन' विचारवंत डॉ. ना.य.डोळे यांनीही केले आहे.

प्रशासनाच्या नैतिकअधिष्ठानाविषयी वेगवेगळया विचारवंतानी वरीलप्रमाणे मते व्यक्त करून प्रशासनातील नितीमूल्यांची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

**सारांश :**

समकालीन लोकप्रशासनाच्या प्रभावशीलतेसाठी व परिणामकारकतेसाठी तिला नीतीमूल्यांच्या अधिष्ठानाची किंवा चौकटीची नितांत गरज आहे हे दिसून येते. लोकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी, त्यांना सेवा पुरवून त्यांच कल्याण करण्यासाठी मूल्याधिष्ठीत प्रशासनाची आवश्यकता भासते. चिनी तत्वज्ञ कन्फ्युशियसने जीवन आणि चरित्र निर्माणासाठी सदाचारावर भर दिला आहे, जो विश्वातील अनेक धर्मांनी या मूल्यांची शिकवण दिली आहे. जोपर्यंत माणुस स्वत: सदाचारी बनणार नाही तोपर्यंत जग सदाचारी बनणार नाही. महात्मा गांधीजीही असे म्हणत असत की, 'जे परिवर्तन तुम्ही जगामध्ये पाहू इच्छिता ते प्रथम स्वत:मध्ये पहा.' भारतीय संस्कृतीनेही नेहमी उदात्त नितीमूल्यांची शिकवण दिलेली आहे. भारतीय संस्कृतीविषयी साने गुरूजी म्हणतात की, 'भारतीय संस्कृती हृदय व बूध्दी यांची पुजा करणारी आहे. उदार भावना व निर्मळ ज्ञान यांच्या योगाने जीवनात सुंदरता आणणारी ही संस्कृती आहे. ज्ञान विज्ञानास हृदयाची जोड देऊन संसारात मधुरता पसरू पाहणारी संस्कृती आहे. भारतीय संस्कृती म्हणजे कर्म, ज्ञान व भक्तीचा जीवंत महिमा, शरीर बुध्दी यांना सतत सेवेत झिजविण्याचा महिमा, एकंदरित त्यांनी आपल्या संस्कृतीमधील उदात्त व सेवाभावी मूल्यांची महती व्यक्त केली आहे. या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, शासनाच्या स्वरूपास व कार्यास नितीमुल्यांचा आधार अत्यंत महत्वाचा ठरतो. शासनाच्या सर्वश्रेष्ठ स्वरूपाच्या प्रकटीकरणासाठी नैतिकतेचा अंतर्भाव असणे आवश्यक असल्याचे दिसून येते.



Scanned with CamScanner

संदर्भ :

१. डोळे ना.य., पायाभूत अभ्यासक्रम, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९
२. भट्टाचार्य मांहित, अनु.फडके वासंती, न्यू होरायझन्स ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २०११
३. भोसले शिवाजीराव, हितगोष्टी, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पुणे, २००४
४. रामचंद्रन पदमा, अनुवाद नरेश नदीम, भारत मे लोकप्रशासन, नेशनलबुक ट्रस्ट, इंडिया, २००५
५. व्दितीय प्रशासनिक सुधार आयोग, चौथी रिपोर्ट, शासन में नैतिकता, भारतसरकार जनवरी २००७
६. नागतोडे किरण, नैतिकमूल्य शिक्षण, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६



Scanned with CamScanner